प्रेस नोट दिनांक २७/१०/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ४४/२०२१ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | **लोकसेवक श्री. प्रकाश श्रीपाद दळवी, वय ५७ वर्षे, पद.– पो.ह.चा.क्र.३००३५, नेमणूक–मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई प्रतिनियुक्तीवर संकिर्ण विभाग येथे कार्यरत असून ड्रोन वाहनावरील चालक** |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये ७५,०००/–** |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये ५०,०००/–** |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | **रुपये ५०,०००/–** |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी यांचा गुटखा पान मसाला चा व्यवसाय असुन फेब्रुवारी २०२१ मध्ये त्यांच्या विरूध्द गुटख्याचा व्यवसाय केल्याबाबत सर जे जे मार्ग पोलीस ठाणे येथे गु. र.क्र. ३७/२०२१ अन्वये गुन्हा नोंद आहे. नमुद गुन्ह्यातील अटकेतुन त्यांना जामीन मंजुर झाल्यानंतर त्यांनी त्यांचे गुटख्याचा व्यवसाय बंद करून सुरती मोहल्ला या ठिकाणी ते पानपट्टीचे दुकान चालवितात.<br>यातील आलोसे हे मोटार परिवहन नागपाडा येथे नियुक्तीस असून प्रतिनियुक्तीवर पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई येथे ड्रोन गाडीवर बदली चालक म्हणून कर्तव्य बजावित आहेत. त्यांच्या कर्तव्याच्या अनुषंगाने जास्तीत जास्त वेळ पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई यांच्या आवारात असतात. त्यामुळे नमूद कार्यालयातील विविध विभागामध्ये केल्या जाणाऱ्या कामकाजाची संपूर्ण माहिती आलोसे यांना असल्यामुळे सदर माहितीचा व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याशी असलेल्या ओळखीचा गैरफायदा घेवून व स्वत: पोलीस विभागात कार्यरत असल्याने फिर्यादीवर प्रभाव टाकून स्वत:च्या पदाचा दुरूपयोग करून स्वत:च्या फायदयाकरिता फिर्यादी व त्यांचा मित्र यांचेकडून पानपट्टीचे दुकानातून गुटख्याचे वेगवेगळे पध्दतीचे पान मसाले विक्री करण्याचे असेल तर दरमहा रू. २५,०००/– तसेच गुड लक म्हणून १,००,०००/– देणेबाबत लाचेची मागणी केली. फिर्यादी व त्यांचे मित्र यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/१०/२०२१ रोजी या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>त्यानंतर दि. २६/१०/२०२१ व दि. २७/१०/२०२१ रोजी झालेल्या पडताळणीदरम्यान यातील आलोसे यांनी फिर्यादी व त्यांचे मित्र यांच्याकडे तडजोडीअंती रू. ७५,०००/– रोख रक्कमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br>आज दि. २७/१०/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रू. ७५,०००/– या रक्कमेपैकी रू. ५०,०००/– रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

( सरदार नाळे )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

संपर्क:लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,फेसबुक: www.facebook.com Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net.